**<u>खटला क्र. २८९/पीडब्ल्यु/२०२५</u>** **<u>निशाणी क्र. ५८ क्रमशः</u>**

साक्षीदार क्र. २

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांचे तर्फे:—</u>**

**<u>शपथेवर सुरु:—</u>**

६. ज्या ओडी अंकाउंट मधून दि. ३०.०३.२०२४ ला जी २५ लाखाची रक्कम वळती केलेले होती ती रक्कम बॅक खात्याचे शेवटचे सहा आकडे **क्र. ११००२४** या खात्याचे लेखा परिक्षण करत असताना आरोपीतर्फे पुरवण्यात आलेल्या खाते उता—याशी जुळत नव्हती. तो खाते उतारा मी प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला आहे. मला तो खाते उतारा आता दाखवण्यात आला. तो खाते उतारा प्रज्योत भागवत याने ईमेलव्दारे आमच्या फर्मला पाठवलेला असल्याने त्याबाबतची मला माहिती आहे. (सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदरील बॅकेच्या खाते उता—यास निशाणी देण्याबाबत विनंती केली. बचाव पक्षाचे विधिज्ञ यांनी त्याबाबत असा आक्षेप नोंदवला की, सदरील दस्त हा मूळ अंतिम अहवालाचा भाग नाही, त्यामुळे तो दस्त पुरावा म्हणून ग्राहय धरता येणार नाही. अविवाधितपणे साक्षीदार हे फिर्यादी संस्थेचे लेखा परिक्षक आहेत. ते ज्या फर्मचे प्रतिनिधित्व करतात त्या फर्मचे ते सहभागीदार देखिल आहेत. त्यामुळे केवल संदर्भीत केलेला दस्त हा अंतिम अहवालाचा भाग नाही या कारणाने नाकारता येणार नाही. त्यामुळे बचाव पक्षाचा आक्षेप फेटाळण्यात येतो. सदरील खाते उता—यास **निशाणी क्र. ७१** देण्यात येत आहे.) **निशाणी ७१** वर दाखल असलेल्या खाते उता—याची जी प्रिन्ट आउट घेण्यात आलेली आहे तो खाते उतारा प्रज्योत भागवत याने **contact@aoamumbai.in** या ईमेल आयडीवरुन आमच्या फर्मच्या **nikita.jadhav@gokhalesathe.in, anuja.rane@gokhalesathe.in, neha.pradhan@gokhalesathe.in** या ईमेल आयडीवर प्राप्त झाला होता. तो ईमेल पाठवताना जो संदेश पाठवण्यात आला होता त्याची देखिल प्रत मी सोबत जोडली आहे. ती प्रत **निशाणी क्र. ७२** वर आहे.

७. लेखा परिक्षण करत असताना प्रज्योत भागवत याच्या व्यक्तिगत

खात्याला ज्या रक्कमा संस्थेच्या खात्यावरुन ज्या वर्ग झाल्या होत्या त्याबाबतची सर्व माहिती मी प्रथम संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. खानोलकर यांच्या प्रत्यक्ष निदर्शनास आणून दिली. त्यानंतर आम्ही रचना संसदच्या कार्यालयातून आमच्या कार्यलयामध्ये आलो. त्यानंतर त्याच दिवशी म्हणजेच दि. ०८.११. २०२४ रोजी दुपारी २.३० च्या दरम्यान मला श्री. सुहास पाठक यांचा फोन आला. त्यांनी मला फोन वरुन अशी माहिती दिली की, प्रज्योत भागवत हा त्याचे आई, वडिल, दोन मित्रांसह संस्थेत आलेला आहे. श्री. सुहास पाठक यांनी त्याबाबत मला असा निरोप दिला की, संस्था चालक श्री. डहाणुकर यांनी मला संस्थेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहावे अशी विनंती केली आहे. मी त्या दिवशी पवई येथे गेलो होतो. त्यामुळे मला तात्काळ संस्थेच्या कार्यालयामध्ये पोहचणे अशक्य होते. परंतु, माझ्या दोन सहकारी श्रीमती. अनुजा राणे व श्रीमती. निकिता जाधव या माहिम येथिल कार्यालयात असल्याने मी त्या दोघींना संस्थेच्या कार्यालयामध्ये पाठवले होते. मी माझ्या सहका—यांना संस्थेमध्ये काय चर्चा झाली याबाबतचा अहवाल कळविण्यास सांगितले होते. त्याबाबत माझ्या सहका—यांनी संध्याकाळी मला फोनवर अशी माहिती दिली की, प्रज्योत भागवत यांनी संस्थेमध्ये सन २०२१ पासून पैश्याची अफरातफर केलेली आहे. त्याबाबतची प्रज्योत भागवत याने कबूली देवून तो सदरील अफरातफर का करत होता याचे कारण देखिल त्याने स्पष्ट केलेले आहे. मी कारणाबाबत विचारले असता माझ्या सहका—यांनी मला अशी माहिती दिली होती की, आरोपी हा लोकांचे पैसे घेवून शेअर बाजारात गुंतवत होता व लोकांना दिलेल्या अभिवचनाप्रमाणे त्याचा परतावा देते वेळी त्याला पैश्याची निकड भासत होती त्यामुळे पैश्याची अफरातफर करत होता. त्याने संस्थेला जे कबूली पत्र लिहून दिले होते त्यामध्ये संस्थेतील त्याने केलेल्या कथित कृत्यात संस्थेतील कोणाचा देखिल समावेश नसल्याचे देखिल लिहून दिले होते. आम्ही संस्थेचे लेखा परिक्षण करत असताना आरोपी प्रज्योत भागवत याने बनावट बॅक स्टेटमेंट, बनावट बॅक बॅलन्स कन्फर्मेशन, बनावट टिडिएस चलन, बनावट टिडिएस रिटर्न्स

दिल्याचे देखिल त्या कबूली जबाबामध्ये नमूद असल्याचे मला सांगण्यात आले. त्या कबूली जबाबातच आरोपीने त्याने कोणत्या तारखेला संस्थेच्या खात्यावरुन त्याच्या स्वत:च्या खात्यामध्ये रक्कमा वर्ग केल्या होत्या त्याचे विवरण देखिल त्याच्या कबूली जबाबामध्ये दिलेले होते. दि. ०८.११.२०२४ रोजी रात्री मला सुहास पाठक यांनी माझ्या व्हॉट्सअॅपवर त्या कबूली जबाबाची प्रत पाठवली होती.

८. त्यानंतर दि. ०९.११.२०२४ रोजी सकाळी ८.४५ च्या दरम्यान मी रचना संसदच्या कार्यालयामध्ये संस्थेच्या विश्वस्थांना भेटायला गेलो होता. ती भेट होण्यापूर्वी मला प्राचार्य सुरेश सिंग सर यांच्या निजीकक्षामध्ये बसण्यास सांगण्यात आले होते. त्या ठिकाणी बसून मी प्रज्योत भागवत ने दि. ०८.११.२०२४ रोजी जो कबूली जबाब संस्थेस लिहून दिला होता त्याचे वाचन करत बसलो असताना श्री. सुहास पाठक हे प्रज्योत व त्याच्या वडिलास घेवून प्राचार्य सुरेश सिंग सर यांच्या निजीकक्षात आले. मी प्रज्योत भागवत याचा दि. ०८.११.२०२४ रोजीचा कबूली जबाब वाचल्यानंतर मी त्यास सदरील बॅक व्यवहार व त्याचे कागदपत्र कसे व कोणत्या पध्दतीने तयार केले त्याच प्रमाणे कश्याच्या आधारे तयार केले याबाबतचा खुलासा विचारला.

९. मी प्रज्योत भागवत यास बनावाट बॅक स्टेटमेंट त्याने कसे तयार केले याबाबत विचारले असता त्याने मला अशी माहिती दिली की, तो बॅक स्टेटमेंट हा एक्सेलशिटमध्ये डॉउनलोड करत असे. त्यानंतर त्या स्टेटमेंटमध्ये जे व्यवहार दर्शवलेले आहेत त्यामध्ये फेरफार करत असे. तो फेरफार करण्यात आल्यानंतर ते एक्सेलशिट हे पीडिएफ फाईलमध्ये रुपांतरित करत असे. त्याचप्रमाणे बॅक बॅलन्स कर्न्फमेशनच्या बनवाट प्रति देखिल तीच पध्दत वापरुन त्याने तयार केल्या असल्याबाबतचे मला त्याने सांगितले. बनावट टिडिएस चलनबाबत विचारले असता त्याने त्या चलनातील अंकी व लेखी रक्कम यामध्ये फेरफार करुन त्या चलनाची प्रत काढून घेण्याबाबत त्याने सांगितले. त्याबाबत त्याच्याकडे अधिक विचारणा केली असता संस्थेतर्फेपूर्वी

भरण्यात आलेल्या चलनाची पीडिएफ प्रत तयार करुन त्यामध्ये तो सदरील फेरफार करत असत असे त्यांनी सांगितले. बनावट टिडीएस रिटर्न्स बाबत विचारणा केली असता त्याने अशी माहिती दिली होती की, तो रिटर्न्स जनरेट करत असताना जे १५ अंकी मॅन्डेटरी क्रमांक टाकावे लागतात ते क्रमांक रॅन्डमली टाकून रिटर्न्स जनरेट करत असे. त्याने तयार केलेल्या बनावट कागदपत्रांचे स्वतंत्र रेकॉर्ड स्वत:कडे तयार केले होते. ते पाहून तो पुढील रेकॉर्ड तयार करुन आम्हाला ईमेलव्दारे पाठवत असे. दि. ०९.११.२०२४ रोजी मी प्रज्योत भागवत याला त्याने बनावट कागदपत्र तयार करताना कोणती पध्दत अवलंबली होती याबाबत लिखित स्वरुपात माहिती देण्याचे सांगितले. त्याप्रमाणे त्याने तसा लेखी कबूली जबाब माझया समक्ष लिहून दिला होता. तो जबाब लिहून देते वेळी श्री. सुहास पाठक व प्रज्योत भागवतचे वडिल हे त्या ठिकाणी हजर होते. प्रज्योत भागवतने तो जबाब त्याच्या स्वत:च्या हस्ताक्षराने लिहून दिला होता. मला आता **निशाणी क्र. ४९ व ५०** वर दाखल असलेले प्रज्योत भागवत याचे लेखी जबाब दाखवण्यात आले. त्यावर प्रज्योत भागवत याची स्वाक्षरी नमूद आहे. ते जबाब माझ्या समक्ष प्रज्योत भागवत याने लिहून दिले असल्यामुळे त्याबाबची मला माहिती आहे.

**(न्यायालयाची दुसऱ्या सत्राची वेळ संपल्याने पुढील कामकाज दिनांक ११.१२.२०२५ पर्यंत तहकूब करण्यात येत आहे. )**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : १०/१२/२०२५.**